दै. लोकमत दि 11-02-2023

## अवघ्या तासाभरात पाच दरोडेखोरांना अटक

# भावाशी वाद घातल्याने मालकाच्या घरी दरोडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** भावाशी वाद घातल्याचा राग मनात धरून राजस्थान येथील काही साथीदारांच्या मदतीने मालकाच्याच घरी दरोडा टाकण्यात आला. ही घटना शुक्रवारी सकाळी पावणे अकरा वाजेच्या सुमारास वेदांतनगर भागात घडली. पोलिसांना ११२ या क्रमांकावर माहिती मिळताच अवघ्या तासाभरात पाचही दरोडेखोरांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिली.

विकास शर्मा हे टाईल्स आणि मार्बलचे व्यापारी आहेत. त्यांच्याकडे गेल्या दीड वर्षापासून प्रदीप शंकरलाल स्वामी हा नोकर कामाला होता. परंतु काही दिवसापूर्वीच शर्मा यांचा प्रदीपच्या भावासोबत वाद झाला होता. त्याचा राग प्रदीपच्या मनात होता. त्यातून त्याने मालकाच्याच घरी दरोडा टाकण्याचा कट रचला. त्यासाठी राजस्थानमधील इतर तिघांना बोलावून घेतले. त्यांना मालकाच्या घरात लाखो रुपयांचा ऐवज असल्याची माहिती दिली. ठरल्यानुसार शुक्रवारी सकाळी पाचही जण वेदांतनगर भागात आले. त्यातील तिघे हे घरात गेले. तर दोघे जण बाहेर टेहळणी करीत होते.

यावेळी आरोपींनी शर्मा यांच्यासह त्यांची पत्नी आणि मुलाला खंजर लावून ८० हजार रुपयांचे मंगळसूत्र काढून घेतले. तसेच कपाटातील पैसे काढण्यास सांगितले. तोच घराबाहेर गोंधळ सुरु झाला होता. त्यामुळे बाहेर थांबलेले दोघे जण अगोदरच पळाले. तर गोंधळाचा आवाज ऐकून तिघांनीही धूम ठोकली. शर्मा यांच्या पत्नीने लगेच डायल ११२ वर माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हलविली. वेदांतनगर आणि आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला असता तिघे जण संशयितरीत्या फिरताना आढळून आले. पोलिसांनी त्यांना पकडून अंगझडती घेतली असता, त्याच्याकडे मंगळसूत्र आणि खंजर आढळून आले. त्यानंतर या गुन्ह्यातील अन्य दोघांनाही पकडले. त्यात प्रदीप शंकरलाल स्वामी, पवनकुमार रामुराम जाठ, राजेंद्रकुमार सुरेशकुमार जाठ, पंकज शंकरलाल स्वामी आणि मनीष नेमीचंद सेन अशी या आरोपींची नाव आहेत.



### लिंबगाव ठाणेदार चंद्रकांत पवार यांची धडाडी

१ कंट्रोल रूममधून दरोड्याची माहिती मिळताच शहरातील सर्वच पोलिस ठाणे अलर्ट झाले होते. त्यात गोळीबाराच्या घटनेतील आरोपींच्या शोधात असलेले लिंबगावचे सपोनि चंद्रकांत पवार, पोहेकॉ.वाणी, मुंजाजी चवरे, खंडागळे यांच्यासह पोउपनि गोटके, हाके, दत्तराम जाधव, शरदचंद्र चावरे, मनोज परदेशी, रमेश सूर्यवंशी, बालाजी कदम यांनी परिसर पिंजून काढला. त्याचवेळी आरोपी त्यांच्या गळाला लागले.

२ दरम्यान, पोलिस अधीक्षक यांनी दरोडेखोरांना पकडणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना रिवॉर्ड जाहीर केले आहे.

### कामगारांचे फोटो जवळ ठेवा

- घरात किंवा दुकानावर कामासाठी ठेवण्यात आलेले तसेच कन्स्ट्रक्शनच्या ठिकाणी असलेल्या कामगारांचे फोटो आणि त्यांची माहिती संबधितांनी ठेवणे गरजेचे आहे.
- एखादी घटना घडल्यास पोलिसांना त्यामुळे ओळख पटविण्यास मदत होते. घरात इतर वेळी कामासाठी येणाऱ्या व्यक्तींवरही लक्ष ठेवावे असे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे.

सध्या गंगानगर (किनवट) येथे राहणाऱ्या सचिन मोहन जाधव यास

या युवकाकडून आरोपींनी ३० जुलै २०२० ते १२ ऑक्टोबर २०२२ दरम्यान सात लाख रुपये घेऊन फसवणूक

यामध्ये आरोपी आनंदराव रामजी सोनकांबळे व्यवसाय सेवानिवृत्त वनपाल, राहुल आनंदराव सोनकांबळे व्यवसाय बेरोजगार (दोघे रा.

मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गणेश पवार, पोकाँ कागणे, पठाण यांनी आरोपींना अटक केली असून या आरोपींना न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली असल्याचे सांगण्यात आले.